# वास.... सुवास..... परिमळ

माणसाच्या पंचेंद्रियांपैकी नाक हे खूप महत्वाचे इंद्रिय. सभोवतालच्या परिसरातील वास त्याला लगेच येतो. नाकमार्गात हवा जेव्हा आत जाते, ती तीन टप्प्यातून. शेवटचा टप्पा म्हणजे गंधवाही मार्ग. नाकाच्या आतील भागातील हवेतील गंधरेणूंमुळे, गंधपेशी उद्दीपित होतात. ज्यामुळे गंधाची अर्थात वासाची जाणीव होते.

'वास' अथवा गंध ही माणसाला मिळालेली मोठी देणगी आहे. ज्यामुळे त्याला चांगल्या आणि वाईट पदार्थाची विभागणी करणे शक्य होते. विषारी पदार्थांची जाणीव होते आणि त्यामुळे त्यापासून होणारे संभाव्य धोके टळतात. माणसाला एवढे गंधज्ञान आहे की, सुमारे एक ट्रिलियन एवढे विविध गंध माणूस ओळखू शकतो. गंधज्ञान हे पुरुषांपेक्षा स्त्रियांमध्ये जास्त असते. नुसत्या वासाने नवरा कुठे गेला हे बायको ओळखू शकते. असो, गमतीचा भाग सोडला तर हे गंधज्ञान ही माणसाला विशेषतः स्त्री वर्गाला मिळालेली मोठी नैसर्गिक देणगी आहे. आता गंध हा सुगंध अथवा दुर्गंधही असतो. जो वास अथवा गंध सामान्य माणूस सहन करू शकत नाही तो दुर्गंध. कुजलेल्या वस्तूंचा वास, पेट्रोल आणि तत्सम खनिज तेलांचा वास माणसाला बेचैन करतो. रासायनिक पदार्थांचा दर्प अथवा वास माणसाला घातक ठरू शकतो जसे क्लॉरोफॉर्म, ज्याच्या वासाने मूर्च्छा येते. मात्र काही वास अगदी सुवासिक नसले तरी माणसाला हवेहवेसे वाटतात. लहानपणी नवीन पुस्तकांचा एक विशिष्ट वास अगदी हवाहवासा वाटतो. लहान मुलांना 'बुढ्ढी के बाल' चा वास सुखावतो. बुक बाईडिंग केलेल्या वही, पुस्तकांचा विशिष्ट वास, मुलांना सुखावतो. अभ्यंगस्नानाच्या वेळी असलेल्या उटण्याचा वास.

सुवास हा माणसाला फक्त सुखावत नाही तर उत्तेजित करतो. सुवास म्हटलं की फुलं आठवतात. फुलांचा राजा, गुलाब, हे प्रेमीयुगुलांचे लाडके फूल असले तरी त्याचा मोहक वास सगळ्या वयोगटातील लोकांना आवडतो. फुलामधील मोगरा, चाफा, बकुळ, अबोली, जाई, जुई अशी किती सुगंधित फुले आहेत. मोगरा, चाफा आणि बकुळी ही फुले उन्हाळ्यात छान फुलतात आणि त्यांचा सुगंध दरवळत राहतो. मोगरा छान फुलला की तो झाडावर छान दिसतोच पण त्याचा सुवास चहूकडे पसरतो. माऊली सहज काव्य करतात,

‘मोगरा फुलला  
फुले वेचिता बहरू  
कळियांसी आला’

मोगऱ्याच्या कळ्यांचा गजरा हा समस्त स्त्री वर्गाचा weak point आहे. गजरा माळणे ही जरी थोडी कालबाह्य fashion असली तरी मागच्या पिढीतील स्त्रियांना नवऱ्याने आणलेल्या मोगऱ्याच्या

गजऱ्याचे आणि त्या सुवासाचे किती वेड असेल. चाफा हा सोनचाफा, देवाचाफा, पिवळा चाफा, हिरवा चाफा अश्या अनेक प्रकारांत आहे पण चाफ्याचा सुवास काही विशेषच. ह्या फुलांच्या सुगंधाने, सुवासाने मन प्रसन्न होतं. सुस्तावलेल्या मनाला मरगळ आली तर ती मरगळ ह्या फुलांच्या सुवासाने दूर होते. आज बऱ्याच wellness centre मध्ये aroma therapy हा उपक्रम आहे.

सुवास म्हटलं की फुलांसोबत फळांचाही वास आठवतो. हापूस आंब्याचा वास मन मोहून टाकतो किंबहुना हापूस खाण्याची पहिली 'पायरी' म्हणजे त्याचा सुवास घेणे आणि त्याच्या वासाचा आनंद घेणे होय. तसा आंब्याला मोहोर आला की एक छान विशिष्ट वास येतो. संत्र्याचा छान वास, अननसाचा वास, फणसाचा एक विशिष्ट वास.

पहिल्या पावसाने मातीला जो सुवास येतो, तो मनमोहक वास चिरकाल स्मरणात राहतो.

प्रत्येक पदार्थाला जसा वास असतो तसाच त्या धान्याला एक विशिष्ट वास असतो. तांदूळ म्हटलं की विशिष्ट वास असतो. कोल्हापूर जवळ आजरा, येथील 'घणसाळ' तांदूळ आहे त्याला एक छान सुवास असतो. आंबेमोहोर तांदळाचा वास असाच सुंदर. बासमती तांदळाचा सुवास काय वर्णावा ? त्या सुवासाने बिर्याणीसारख्या पदार्थाला विशिष्ट वास येतो. शिजवलेल्या अन्नाचा एक छान वास असतो त्या सुवासाने भूक चाळवते. तळणाचा विशिष्ट वास माणसाची भूक उद्दीपित करतो. ह्या सुवासांवर माणसाचे जीवन आनंददायी बनते.

वास आणि आठवण ह्यांचे दृढ नाते आहे. प्रत्येक विशिष्ट वासांसोबत काही आठवणी दीर्घकाळ जोडल्या जातात. लहानपणी चुलीवर स्वयंपाक होत असे, त्या धुरासोबत आणि पदार्थांच्या वासांसोबत त्या आठवणी चिरकाल टिकून राहतात. लहानपणी वापरलेली दुलई अथवा गोधडी त्याला जो विशिष्ट वास असतो तो गतकाळातील स्मृतींना जोडला जातो.

'परिमळ' हा वासाचा एक प्रकार, पण तो फक्त सुवास अथवा सुगंध इथपर्यंत मर्यादित नाही. परिमळ हा चित्तवृत्ती उल्हासित करणारा सुगंध आहे. परिमळ हा मंद सुवासाचा प्रकार, वाऱ्यावर आलेल्या गंधांमुळे परिमळ पसरतो. संध्याकाळी वाऱ्याची मंद झुळूक येते, ती मंद झुळूक मोगऱ्याचा सुगंध घेऊन हाच 'परिमळ'. परिमळ हा मंद सुवास जो दीर्घकाळ टिकून राहतो. रातराणीचा मंद सुवास हवेच्या नाजूक झुळकीने परिमळ पसरवतो.

'रातराणीच्यामुळे ।
श्वास धुंद परिमळे ।
फुलत प्रीतीची फुले ।।'

असे हे परिमळाचे महत्व.

चंदनाचा परिमळ असाच हवेच्या झुळकीने पसरतो. तुकोबा म्हणतात, 'चंदनाचे परिमळ आम्हा काय त्याचे'. चंदनाचा गंध, परिमळ वाऱ्यासोबत आपोआप पोहोचतो म्हणूनच चंदनाला त्याच्या सुवासाची घोषणा करावी लागत नाही. मोगरा अथवा पारिजातकाच्या फुलांनी भरलेली ओंजळ रिती केली तरी त्या हातांना त्या फुलांचा परिमळ दीर्घकाळ टिकून राहतो. आपल्या बोटाने कोणाला लावलेला चंदनाचा लेप, सुगंध पसरवतोच पण लेप लावणाऱ्या व्यक्तीच्या हाताला त्याचा परिमळ दीर्घकाळ टिकून राहतो.

हा परिमळ मंद वाऱ्यासोबत पसरतो पण मागे असलेल्या फुलाला जणू ओस सोडतो. त्यालाच अनुसरून माऊलींनी आत्म्याला परिमळाची आणि आणि देहाला फुलांची उपमा दिली आहे. मृत्यूनंतर आत्मा जणू परिमळाप्रमाणे देह सोडतो आणि पुढच्या प्रवासाला निघून जातो.
माऊली म्हणतात,

'परिमळ निघालिया पवनापाठी ।
मागे ओस फुले राही देठी ।
तैसे आयुष्याचेनी मुठी ।
केवळ देह ।।'

परिमळाचे यथार्थ वर्णन करणारा ज्ञानेश्वर माऊलींचा अभंग आहे,

‘अवचिता परिमळू
झुळुकला अळुमाळू
मी म्हणु गोपाळू
आला गे माये।‘

एका उच्च अध्यात्मिक स्थितीचे वर्णन करताना माऊलींनी परिमळाला जणू 'आत्मारुपी सुगंधा'ची उपमा दिली आहे. देहात असलेली चेतना म्हणजे आत्मा त्याचं तेज रूपाने दर्शन होतं जणू. काही वेळा त्याची अळूमाळू म्हणजेच अधूनमधून वाट बघावी लागते. त्या परिमळाचा, अर्थात आत्मरुपाचा अवचित, अचानक साक्षात्कार होतो, झळकतो. जणू वाटतं देव प्रकटला म्हणून माऊली म्हणतात,

'मी म्हणु गोपाळू
आला गे माये'

**- मनोज कुरुंभटी**